**Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University, Aurangabad**

**Training programme attendance report under DBT-project**

**Project title:** Sustainable Rural Development through Beekeeping

**Title of the training: Awareness of beekeeping activity**

**Place-** [illegible] **Date-** 21/11/2017

| Sr. | Name of trainee | Age | Mobile | Signature |
|---|---|---|---|---|
| 1 | Digambar K. Khandagale | | 7588640151 | [signature] |
| 2 | Dnyaneshwar R. Lahule | 45 | 7588396274. | [signature] |
| 3 | Ramdas K Sasute | 25 | 9561085927 | [signature] |
| 4 | Shivaji AppaRao | 31 | 9545931029 | [signature] |
| 5 | Shreenath Ramrao | | | |
| 6 | Kale | 32 | 9960621887 | [signature] |
| 7 | बळीराम सखाराम फुस | 35 | 9860640059 | [signature] |
| 8 | Suresh TirmBak Bobade | 35 | 9730618832 | [signature] |
| 9 | Rajesh Laxman Nalawade | 32 | 7755985104 | [signature] |
| 10 | गोविंदराव भावरावनलावडे | 80 | ८८२९४३२४६६ | [signature] |
| 11 | बाबुराव किसननलावडे | ४० | ९६३५८३२००३ | |
| 12 | Sandeep Prabhakar Nalawade | 27 | 9403537796 | [signature] |
| 13 | बाळासाहेब भिकनराव घुले | 36 | 9545139616 | [signature] |
| 14 | अरुण कडुबा जाधव | 27 | 9860993149 | [signature] |
| 15 | तेजराव किसन नलावडे | 42 | 9049261466 | [signature] |
| 16 | गजेंद्र रमेश जाधव | 23 | 7875466639 | [signature] |
| 17 | अमोल भाऊसाहेब जाधव | 23 | 8275316356 | [signature] |
| 18 | राजेंद्र आत्माराम नलावडे | 48 | 9890179924 | [signature] |
| 19 | | | | |
| 20 | | | | |

**Signature of Project Assistant** **Signature of PI** [signature]














## पाल येथे प्लास्टिकमुक्ती अभियान

पाल, ता. २७ (बातमीदार) : पाल (ता. फुलंब्री) येथे प्लास्टिक मुक्ती अभियानांतर्गत प्लास्टिक व कचरा साफसफाई मोहीम राबविण्यात आली. यावेळी सरपंच गणेश रेशवाल, ग्रामसेवक श्री. जाधव, ग्रामपंचायत सदस्य गणेश ढेपले, देवनाथ जाधव, किरण कुऱ्हाडे, ग्रामपंचायत कर्मचारी सुपडुभाई पठाण, गंगाधर असवले, साईनाथ गोल्हारे, श्री. काळे, अनिल ढेपले यांची उपस्थिती होती.

निवडक लेख, बातम्या मिळवा व्हॉट्सॲपवर!
आपला मोबाईल नंबर SMS ने नोंदवा
9922421511



### अवतीभवती



गोळेगाव (ता. खुलताबाद) : संविधान दिनानिमित्त जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करताना विद्यार्थी, शिक्षक.

## गोळेगाव येथील जिल्हा परिषद शाळेत संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन

टाकळी राजेराय, ता. २७ (बातमीदार) : गोळेगाव (ता. खुलताबाद) येथिल जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेत सोमवारी (ता. २७) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस अभिवादन करून संविधान दिन साजरा करण्यात आला. या वेळी संविधानाच्या उद्देश पत्रिकेचे सामूहिक वाचन करण्यात आले; तसेच भारतीय लोकशाही व संविधानाचे महत्त्व, स्वातंत्र, समता, बंधुता, न्याय, नागरिकांचे हक्क व कर्तव्य, जबाबदारी, उत्तरदायित्व याबाबत माहिती देण्यात आली. या वेळी सरपंच संतोष जोशी, मुख्याध्यापक संजय वैष्णव, पोलिस पाटील अजिनाथ जाधव, गणेश जिते, अंगणवाडी सेविका सुभद्रा गोल्हार, बाळू जाधव, हेमराज पाटील, चंद्रकांत कुलकर्णी, दगडू रायपुरे, राजेंद्र महाजन आदी उपस्थिती होती.



# मधपेट्या सावलीत, ओलसर ठिकाणी ठेवू नयेत

## डॉ. भालचंद्र वायकर : बाजारसावंगी येथे मधमाशापालनविषयक कार्यशाळा

**बाजारसावंगी, ता. २७ (बातमीदार) :** थंडीच्या काळात म्हणजे डिसेंबर ते जानेवारीदरम्यान मधपेट्या झाडाच्या सावलीत व ओलसर ठिकाणी ठेवू नयेत. वसाहती पूर्ण दिवस उन्हात राहतील अशा ठिकाणी ठेवाव्यात. पेटीत गार हवा जाऊ नये म्हणून पेटीची दारे हवेच्या उलट्या दिशेने ठेवावीत. मधकोठ्या वसाहतीस दिलेल्या असल्यास त्या काढून घ्याव्यात. थंडीच्या काळात मध काढू नये तसेच वसाहतीचे विभाजन करू नये, असे आवाहन डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे डॉ. भालचंद्र वायकर यांनी केले.

बाजारसांगवी (ता. खुलताबाद) येथील राजेंद्र नलावडे यांच्या शेतावर मंगळवारी (ता. २१) 'मधमाशापालन' यावर एकदिवसीय कार्यशाळा झाली. या वेळी डॉ. भालचंद्र वायकर यांनी प्रात्यक्षिकांसह मार्गदर्शन केले. त्यांनी मधमाशांच्या वसाहतीचे नैमित्तिक व मोसमी देखभालीचे तंत्र, वसाहतीची तपासणीची पद्धती, स्वच्छता, वसाहतीस मेणताव देणे व थंडीतील व्यवस्थापन यावर मार्गदर्शन केले.

डॉ. वायकर म्हणाले, की मधमाशा या थंड रक्ताच्या कीटक आहेत. वसाहतीतील पिलावळीच्या निकोप वाढीसाठी ३२ ते ३५ डिग्री सेल्सियस तापमानाची व ४० टक्के आर्द्रतेची गरज असते म्हणून मधपाळाने थंडीच्या काळात काळजी घ्यावी. वसाहती जोमदार राखाव्यात, कमजोर वसाहती मिसळून जोमदार कराव्यात. वसाहतीत पुरेसा मधसाठा नसल्यास, साखरपाक द्यावा. थंडीच्या काळात पेटीच्या छपराखाली सुतळीचे पोते व नंतर झाकण घट्ट लावावे.



बाजारसावंगी (ता. खुलताबाद) : येथील राजेंद्र नलावडे यांच्या शेतात मधमाशीपालन कार्यशाळेत शेतकऱ्यांना वसाहती हाताळण्याचे प्रशिक्षण देताना डॉ. भालचंद्र वायकर.

### कांदा बिजवाईसाठी व्यवस्थापन

डॉ. वायकर यांनी सांगितले, की उत्तम, भरघोस व दर्जेदार कांदा बिजवाईच्या निर्मितीसाठी मधमाशांमार्फत परागीभवन होणे गरजेचे असते. गेल्या काही वर्षांपासून परागीभवन करणाऱ्या कीटकांची व मधमाशांची संख्या झपाट्याने कमी होत आहे. त्यामुळे कांदा बिजवाईची गुणवत्ता व एकरी उत्पादनात मोठ्या प्रमाणात घट होत आहे. शेतकऱ्यांनाही याची जाणीव झाली आहे. काही शेतकरी मधमाशा आपल्या कांदा बिजवाईच्या शेतात येण्यासाठी गुळाचे पाणी करून शिंपडतात. गुळामध्ये क्षार असल्यामुळे मधमाशा हगवणग्रस्त होऊन मरतात. त्यावर उपाय म्हणून शेतकऱ्यांनी कांद्याची लागवड केल्यानंतर दोन ते तीन आठवड्यांनी तीळ, मोहरी, करडई, सूर्यफूल अशा मकरंद तयार करणाऱ्या पिकांची २ ते ३ टक्के लागवड करावी.

कांद्याच्या बिजवाईला फुले येण्याचा काळ व तीळ, मोहरी, करडई, सूर्यफुलाला फुले येण्याचा काळ एकसारखा होईल अशा बेताने पिकांची लागवड करावी. त्यामुळे परिसरातील मधमाशा कांदा बिजवाईच्या शेतात येतील. परागीभवन खात्रीशीर तर होईल भरघोस, दर्जेदार उत्पादन होईल तसेच एकरी सातेरी मधमाशांच्या दोन पेट्या ठेवल्यास उत्तम, दर्जेदार, भरघोस कांदा बिजवाईची निर्मिती होईल.